**१८ व्या पिफ अंतर्गत आज बुधवार दि. १५ जानेवारी रोजी झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे -**

पुणे फिल्म फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या १८ व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज बुधवार दि. १५ जानेवारी, २०२० दरम्यान झालेल्या पत्रकार परिषदांमधील महत्त्वाचे मुद्दे खाली देत आहोत. आज महोत्सवाचे कलात्मक दिग्दर्शक समर नखाते यांनी पत्रकार परिषदेसाठी उपस्थित दिग्दर्शक व निर्माते यांच्याशी संवाद साधला.

**चित्रपट – लिझाज टेल**
**उपस्थिती** – वलेरी काल्मिको (निर्माता), इरिना ग्लुश्कोवा (अनुवादक)

डाऊन सिंड्रोम असलेल्या विशेष मुलांवरील 'लिझाज टेल' हा चित्रपट आहे. अशा मुलांसाठी हे जग योग्य नाही अशी दिग्दर्शकाची भावना असून या जगात त्यांना आनंद, प्रकाश मिळू शकेल का? याचा शोध घेणारा हा चित्रपट आहे.

- हा चित्रपट युक्रेनच असून दिग्दर्शकाने मानवी भावना यात दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. दिग्दर्शक अलेक्झांडर झहोन्ना हे स्वतः डाऊन सिंड्रोम असलेल्या विशेष मुलांच्या ४ शाळांमध्ये प्रशिक्षक म्हणून गेली ३० वर्षे काम करतात, त्यामुळे त्यांच्या अनुभवावर आधारित एक कादंबरी त्यांनी लिहिली असून त्या कादंबरीवरून सत्य कथेवर आधारित हा चित्रपट असल्याचे काल्मिको यांनी सांगितले.

- ते म्हणाले, "अलेक्झांडर कोणीही प्रशिक्षित दिग्दर्शक नाही. मात्र त्यांच्या कार्यकाळात मानत साठलेल्या भावनांचा सर्जनशील निचरा या चित्रपटात झाला आहे. या विशेष मुलांविषयी समाजात फारशी जागरुकता नाही. म्हणून या मुलांचे जग चित्रपटाच्या माध्यमातून दाखवायचा प्रयत्न केला आहे. ज्या मुलांचे पालक आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत ते आपल्या मुलांना बऱ्याच गोष्टी शिकवून त्यांच्या आयुष्याला वेगळेवळण देण्याचा प्रयत्न करतात मात्र ज्या मुलांना असा आधार नाही त्यांचे आयुष्य असेच या शाळांमध्ये निघून जाते."

- "चित्रपट अभिनयासाठी व्यावसायिक कलाकार घ्यायचे ठरवले होते. तसे मिळालेही परंतु नंतर काही अडचणी आल्या. म्हणून मग याच मुलांमधून निरीक्षण करून काही मुले निवडली व त्यांनी उत्तम साथ देत अभिनय केला." असेही काल्मिको यांनी सांगितले.

२) **चित्रपट – द टीचर**

**उपस्थिती –** ज्युलिया फ्रान्झ्स्के (अभिनेत्री)

ही कथा स्थलांतरित होऊन जर्मनीत नव्याने येणाऱ्या लोकांना भाषेसंदर्भात येणाऱ्या अडचणी, ती शिकून घेण्यासाठी होणारा संघर्ष आणि शिक्षकाची शिकविण्याची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती यावर हा चित्रपट आहे.

- जर्मनी हा देश युरोपातील अन्य देशांपेक्षा सांस्कृतिक व भाषेच्या दृष्टीने फार वेगळा देश आहे. त्यामुळे स्थलांतरित होऊन बाहेरून येणारे लोक त्यात लवकर समयोजित होऊ शकत नाहीत. अशाच एका स्थलांतरित मुलाची भाषा शिकण्याची धडपड म्हणजे हा चित्रपट असल्याचे अभिनेत्री ज्युलिया यांनी सांगितले.

- त्या म्हणाल्या, "चित्रपटाची संहिता मी वाचलेली नव्हती. कारण चित्रीकरणादरम्यान त्यात अनेक बदल होत गेले. त्यामुळे चित्रीकरणाच्या दिवशी त्या दिवशीचे प्रसंग वाचून दिग्दर्शक सांगेल तेवढे मी केले."

- जर्मनीत आजही जुने लोक जातीभेद, उच्च-नीचता मानणारे आहेत. मात्र तरुण पिढी त्या मानाने बरीच मोकळी आहे. ते बाहेरून येणाऱ्यांना स्वीकारत आहेत." असेही त्यांनी सांगितले.


**<u>पत्रकारांना अधिक माहितीसाठी संपर्क : हंड्रेड पर्सेंट पब्लिक रिलेशन्स</u>**

धनश्री भावसार - ९८५०८९०६०० / अदनान अत्तरवाला - ९८२०५३१०५२





national film archive of india
राष्ट्रीय फ़िल्म संग्रहालय
PIFF
18th
Celebrating Cinema
Pune International
Film Festival
Celebrates 60 years of Maharashtra
600/- & 800/-
www.piffindia.com
Starts on 2nd January 2020 at